# श्री शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर

**ता. नेवासा , जि. अहिल्यानगर पिन – ४१४१०५**

website : www.shanidev.com E-mail : shanishingnapur@yahoo.com

## * सन २०२६-२७ *

## ( माहे ऑगस्ट २०२६ ते जुलै २०२७ अखेर )

## श्री शनैश्वर देवस्थानचे विविध विभागासाठी

## किराणा साहित्य पुरविणेबाबत ई-निविदा

श्रीशदे/खरेदी/ई-निविदा क्र.०४ / २०२६-२७ ई-निविदा प्रसिद्धी दिनांक - ०५ / ०८ / २०२६

## ❖ ई-निविदेतील अटी व शर्ती

A. निविदेचा तपशिल - विविध किराणा साहित्य पुरविणेबाबत ई-निविदा

B. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे -

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदययावत दुकान/संस्था नोंदणी प्रमाणपत्र / कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/ खाजगी कंपनी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने FSSAI परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०२२-२३ व २०२३-२४, २०२४-२५ या ३ आर्थिक वर्षांची किमान सरासरी उलाढाल रक्कम रू १,००,००,०००/- असणे अनिवार्य राहील. तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे ( परिशिष्ट क ) CA यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल. सदरचे CA यांचे प्रमाणपत्रावर UDIN नंबर असणे अनिवार्य असेल , UDIN नंबर नसलेले CA यांचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

६. निविदेसोबत हमी पत्र/ निविदा स्वीकृती पत्र "परिशिष्ट ब" ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

C. निविदाधारकाने किराणा साहित्याचे नमुने सादर करण्याची पध्दत-

१. निविदाधारकाने निविदा भरलेल्या अ.क्र १ ते १५ या वस्तूचे ५०० ग्रॅम वजनाचा नमुना प्लास्टिक बरणीमध्ये सीलबंद करून संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. त्या प्लास्टिक बरणीवर मालाचे नांव, कंपनी, प्रकार तसेच आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. दिलेला नमुना कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

२. किराणा साहित्याचा उच्चतम दर्जाचा एकच नमुना सादर करावा. दोन किंवा अधिक नमुने सादर करू नये. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.

३. निविदाधारकाने वस्तुचे नमुने देताना नमुना निवडीसाठी असा नमुना द्यावा की पुरवठा आदेश मिळालेनंतर वर्षभर त्याच कंपनीच्या मालाचा संस्थानला पुरवठा होईल.

D. **पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम -**

१. **माल पुरवठा करण्याचा पुरवठा कालावधी माहे ऑगस्ट २०२६ ते जुलै २०२७ असा राहील.**

२. निविदा फी रक्कम रु २००००/- GST सह बयाणा रक्कम रू.१,६१,५००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. **MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.**

E. निविदाधारकांसाठी सुचना -

१. सदर ई-निविदा ऑनलाइन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि ०५ / ०८ / २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि २१ / ०८ / २०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

२. ई-निविदा भरलेल्या किराणा साहित्याचे नमुने दि २१ /०८ / २०२६ अखेर सायं. ५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) संस्थानचे शनिशिंगणापूर येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि. ११ / ०८ / २०२६ रोजी ( Pre-bid ) निविदा पूर्व बैठक आयोजित करण्यात येईल. सदर बैठकीसाठी निविदाधारक देवस्थान कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहू शकता किंवा निविदेतील अडचणी विषयी लेखी सूचना निविदा पूर्व बैठकीचे दिनांकापर्यंत देवस्थानचे shanishingnapur@yahoo.com या ई-मेल आयडीवर पाठवू शकतात.

५. शक्य झाल्यास दि. २४ / ०८ / २०२६ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये व नमुना पात्र झालेल्या निविदाधारकांच्याच कमर्शिअल ( दराबाबत) निविदा उघडण्यात येतील.

६. निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास निविदा प्रक्रिया ( उदा. नमुने तपासणी, Technical Bid ( तांत्रिक) व Commercial Bid (दराबाबत) पूर्ण करण्यात येईल. याबाबत नंतर कुठलीही तक्रार चालणार नाही. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमधील तक्यात नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणाऱ्या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

७. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

८. प्रत्येक मालाचे मालनिहाय दर वेगळ्या वेगळ्याने मागविण्यात आले आहेत आणि त्याची अपेक्षित मागणी एकत्रितपणे नमूद केली आहे. मागणी नुसार त्या त्या मालाची होणारी एकूण किंमत यांची बेरीज केल्यानंतर संपूर्ण प्रकारच्या सर्व मालांची एकत्रित किंमत काढण्यात येईल आणि त्या वरून L-१ ठरविण्यात येईल. तथापि काही मालाच्या बाबतीत अशा प्रकारे ठरविलेल्या L-१ पेक्षा इतर निविदा धारकांचे दर कमी असल्यास एकंदरीत L-१ ला इतर मालनिहाय L-१ निविदा धारकाचे त्या त्या मालाचे बाबतीत चे दर मॅच करण्याची ( जुळविण्याची ) संधी देण्यात येईल आणि त्याला एकत्रित खरेदी आदेश देण्यात येईत. तथापि त्याने अशा पद्धतीने दर न जुळविल्यास त्या-त्या मालासाठी त्या-त्या मालाचे कमीतकमी दर नमूद करणाऱ्या निविदा धारकांना खरेदी आदेश देण्यात येईल. त्यानुसार साहित्य पुरविणे बंधनकारक असेल. जर मालाचे कमीत कामी दर नमूद करणाऱ्या निविदा धारकाने साहित्य पुरवठा केला नाही तर त्यास ३ वर्षांसाठी काळ्या यादीत टाकण्यात येईल.

९. प्रत्येक मालाचे मालनिहाय दर वेगळ्या वेगळ्याने मागविण्यात आले आहेत आणि त्याची अपेक्षित मागणी एकत्रितपणे नमूद केली आहे. मागणी नुसार त्या त्या मालाची होणारी एकूण किंमत यांची बेरीज केल्यानंतर संपूर्ण प्रकारच्या सर्व मालांची एकत्रित किंमत काढण्यात येईल आणि त्या वरून L-१ ठरविण्यात येईल.याबाबत वरील अट ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल. मात्र L-१ धारकाने त्यास मंजूर असलेल्या साहित्य पुरविण्यास नकार दिल्यास EMD जप्त करण्यात येऊन ३ वर्षांसाठी काळ्या यादीत टाकण्यात येईल.

F. <u>निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे.</u>

१. किराणा साहित्य हे प्रसाद बनविणेसाठी वापरण्यात येणार असल्यामुळे ते उच्चतम दर्जाचे असणे आवश्यक आहे. त्याचा दर भरतांना विचार करावा.

२. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS,TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिग खर्च,जकात, वाहतूक, वाराई वगैरे सर्व खर्चासह शनिशिंगणापूर संस्थानचे भांडार/बर्फी/प्रसादालय विभागामध्ये पोहोचचे दर या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

३. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं. २०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४. निविदा धारकाने Online दर भरताना प्रती नग/ किलो ग्रॅमचे दर भरावेत.

G. <u>ऑनलाईन निविदा उघडण्याची व नमुने निवडण्याची कार्यपध्दती -</u>

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या किराणा साहित्य चा नमुना तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील.

H. <u>साहित्य पुरवठा करावयाचे ठिकाण -</u>

१. निविदेत नमूद केलेल्या मालाचा पुरवठा शनिशिंगणापूर येथील संस्थानचे कांगोणी रोडवरील संस्थानच्या बर्फिप्रसाद गोडावून/प्रसादालय/वसतिगृह/भांडार विभाग येथे करावा लागेल.

I. <u>सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा -</u>

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत किराणा साहित्य पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल . त्यापैकी एकूण निविदेचे

अंदाजित रकमेवर सुरुवातीस भरलेली १ % (EMD) बयाना रक्कम + २% रक्कम ही निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर १५ दिवसांचे आत भरणा करावी लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर आपण मागणी पत्र दिल्यानंतर ३० दिवसात परत करता येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित भरावी लागेल. तसेच शनिशिंगणापूर येथे समक्ष येऊन रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर अथवा शासनाद्वारे वेळोवेळी निश्चित करून दिलेल्या पद्धतीप्रमाणे त्वरित करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास अदा करावी लागेल. करारनामा केल्याशिवाय बील आदा केले जाणार नाही.

J. मालाचा पुरवठा करण्याची मुदत -

१. किराणा साहित्य पुरवठा करण्याचा प्राथमिक पुरवठा कालावधी **ऑगस्ट २०२६ ते ऑक्टोबर २०२६, नोव्हेंबर २०२६ ते जानेवारी २०२७ , फेब्रुवारी २०२७ ते एप्रिल २०२७** व **मे २०२७ ते जुलै २०२७** असा राहिल.

२. किराणा साहित्याचा पुरवठा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसात मालाचा पुरवठा करावा लागेल. प्रसंगी दूरध्वनीवर कळविलेनुसार तात्काळ पुरवठा करावा लागेल.

३. नैसर्गिक आपत्ती, महामारी व इतर कोणत्याही कारणाने मुळे जर मंदिर बंद ठेवावे लागले तर अशा कालावधीमध्ये ई.निविदेमध्ये खरेदी करण्यासाठी दर्शविलेले अंदाजे परिमाण (Etimated Quantity) प्रमाणे किराणा साहित्य खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही. बर्फीप्रसाद, प्रसादालय, वसतिगृह या विभागासाठी लागणाऱ्या किराणा साहित्याची आवश्यकता शनिभक्तांच्या संख्येवर अवलंबून असल्यामुळे ई-निविदेमध्ये दर्शविलेल्या अंदाजे परिमाणापेक्षा कमी किंवा जास्त किराणा साहित्याची गरज भासू शकेल. त्यामुळे ई-निविदेतील अंदाजे परिमाण (Etimated Quantity) इतके किराणा साहित्य खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

४. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर पुरवठा कालावधी संपल्यानंतरही पुढील वर्षाची खरेदीसंबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा किराणा साहित्याची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या मालाचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

५. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद मालाचा पुरवठा हा एकदम करावयाचा नसून संस्थानचे गरजेप्रमाणे दरमहा मागणी चलन पुरवठादारास पाठविण्यात येतील. त्यामध्ये नमूद परिमाण इतकाच किराणा साहित्याचा पुरवठा करावा लागेल. पुरवठा आदेशात नमूद केलेल्या परिमाणा (Quantity) ही अंदाजे रहाणार असून भक्तांच्या संख्येनुसार प्रत्यक्ष मागणी अवलंबून रहाणार आहे. त्यामुळे ई.निविदा किंवा पुरवठा आदेशात नमूद मालाइतके परिमाण (Quantity) खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

K. <u>मालाचा स्वीकार करण्याची पध्दत -</u>

१. पुरवठा आदेशातील ब्रॅड/वर्णनाप्रमाणेच व दिलेल्या ब्रॅडप्रमाणेच किराणा साहित्याचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

२. ज्या ब्रॅडच्या निविदा मंजुर होतील त्याच ब्रॅडचे किराणा साहित्य पुरवावे लागेल. वेगळ्या ब्रॅडचे अगर खराब किराणा साहित्य स्विकारले जाणार नाही. अशा किराणा साहित्याचा पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे व तातडीने दिलेल्या ब्रॅडचा किराणा साहित्य पुरवठा करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. सदोष किराणा साहित्य न नेल्यास, त्या किराणा साहित्याची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर संस्थानचे खरेदी/तज्ञ समितीने आपण दिलेल्या ब्रॅडप्रमाणे /नमुन्याप्रमाणेच वर्षभर किराणा साहित्य पुरविणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

४. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे किराणा साहित्य पाठविल्यानंतर संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून किराणा साहित्याची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास किराणा साहित्य स्विकारण्यात येईल. तथापि किराणा साहित्य स्विकारलेनंतरही त्यातील किराणा साहित्य खराब आढळल्यास ते तात्काळ बदलून दयावे लागेल. सबब पुरवठाधारकांनी दिलेल्या नमुन्याप्रमाणेच किराणा साहित्य पुरविण्याची दक्षता घ्यावी.

५. पुरवठा करीत असलेल्या किराणा साहित्याची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randmoly Sample घेऊन किराणा साहित्य स्विकारले जाते. तथापी किराणा साहित्य स्विकारलेनंतरही एखादा लॉट/गोणी खराब आढळल्यास तो किराणा साहित्य स्वखर्चाने तातडीने बदलून द्यावा लागेल.

६. किराणा साहित्य च्या गोणीवरचे लेबल अन्न सुरक्षा नियम २०११ व वैध मापन शास्त्रच्या तरतुदीप्रमाणे असावे.
   १. उत्पादकाचा FSSAI Lic No.
   २. Brand & Quantity
   ३. Lot No. /Batch No & Date of manufacturing and Best before
   ४. कायद्याप्रमाणे गुणवत्ता व मानके याविषयी हमी ( warranty )

७. पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठा केलेल्या किराणा साहित्य मध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील.

८. किराणा साहित्य पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade असावे.

९. किराणा साहित्य २५ किलो/५० किलो ( गोणी व्यतिरिक्त ) ह्या प्रमाणे वर्षभर केवळ समान वजनाच्या मालाचा पुरवठा स्वीकारला जाईल. याची प्रथम नोंद घ्यावी.

१०. पुरविलेल्या किराणा साहित्याचे गोणीचे वजन वगळता येणारे निव्वळ वजन विचारात घेतले जाईल.

L. <u>लॅब तपासणीची कार्यपध्दती –</u>

१. पुरविलेल्या मालाच्या प्रत्येक बॅचची जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/NABL/ केंद्र शासनाच्या राज्य शासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या मालाचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर किराणा साहित्य तातडीने बदलून द्यावा लागेल. सदर किराणा साहित्य पुरवठा करण्यास विलंब झाल्यास त्यावर थेट मुद्दा क्र N मधील अट क्र १ प्रमाणे दंड आकारण्यात येईल. तसेच त्या दरम्यान संस्थानला बाहेरुन किराणा साहित्य विकत घ्यावा लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेला किराणा साहित्य किंमतीच्या थेट मुद्दा क्र N मधील अट क्र १ प्रमाणे दंड देय असलेल्या कुठल्याही मालाचे बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर आलेला किराणा साहित्य वापरला गेला व नंतर लॅब रिपोर्ट FSSAI Standards प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील मालाच्या किंमतीच्या थेट मुद्दा क्र N मधील अट क्र १ प्रमाणे दंड आकारला जाईल.

४. किराणा साहित्य चा लॅब रिपोर्ट FSSAI Standards नुसार न आलेस सदर पुरवठाधारकावर संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. काही परिस्थितीत लॅबचा रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास केंद्र/राज्य शासनाच्या शासकीय/NABLलॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पूर्ण खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजण्यात येईल.

M. <u>बील अदा करण्याची पध्दती –</u>

१. पुरविलेल्या किराणा साहित्य चे बिल किराणा साहित्य ची तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच अदा करणेत येईल. मालाच्या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. पुरवठा केलेल्या किराणा साहित्य चे बील संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला अदा करण्याचा प्रयत्न राहिल. तथापि तांत्रिक कारणांमुळे बील अदा करणेस विलंब झाला तरीही आपणास संस्थानने मागणी केलेल्या मालाचा पुरवठा थांबविता येणार नाही.

३. पुरवठाधारकाने पुरविलेला किराणा साहित्य संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून किराणा साहित्य खरेदी करावा लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बिलातुन वसुल केली जाईल.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व कर कपाती बिलातून करण्यात येतील.

N. <u>आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद –</u>

१. पुरवठा आदेशातील किराणा साहित्य मुदतीत पुरविला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रु २.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रु २.०० लाखापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने किंवा किमान रु २०००० किंवा ५ % यापैकी जे जास्त असेल ते |

२. किराणा साहित्य पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत मालाचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे किराणा साहित्य नाकारला गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतका किराणा साहित्य दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या मालासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या मालाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. दुरध्वनी/ई.मेलद्वारे कळविलेल्या विहित मुदतीनंतर विलंबाने पुरवठा केलेल्या मालावर थेट मुद्दा क्र N मधील अट क्र १ प्रमाणे दंड आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे किराणा साहित्य पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने किराणा साहित्य पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा किराणा साहित्य पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन किराणा साहित्य खरेदी करावा लागल्यास जादा येणाऱ्या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. अगर याबाबत संस्थानच्या मा.खरेदी समिती/ मा.कार्यकारी अधिकारी यांनी घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा. युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे अथवा कोणत्याही कारणामुळे ) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर मा.खरेदी समिती/ मा.कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

६. निविदाधारकाने स्वत: साठी अगर निविदाधारकासाठी कुणीही कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात केलेला दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबीत नसावा. तसेच निविदाधारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत समावेश नसावे. जर संस्थान विरोधात दावा दाखल केलेला असल्यास सदर निविदाधारकांच्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

O. <u>निविदा वैधता कालावधी -</u>

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

P. <u>सर्व साधारण अटी शर्ती -</u>

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो नेवासा कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. पुरवठादाराने किराणा साहित्य चा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. अगर याबाबत मा.खरेदी समिती/ कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत आपली काहीही तक्रार चालणार नाही.

५. राज्याबाहेरील निविदाधारकाची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात माल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५० टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

६. कोणतीही निविदा अंशतः/पूर्णतः स्वीकारणे/नाकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. तथापि निविदा फी कुठल्याही परिस्थितीत वा कारणास्तव परत केली जाणार नाही.

७. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

८. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

९. **खरेदी विभागाकडून मालाच्या पुरवठ्यासाठी वेळोवेळी केलेल्या ई-मेल व भ्रमणध्वनी आणि दुरध्वनीवरील संवाद/पत्रव्यवहार हा कुठल्याही कायदेशीर कारवाईसाठी (Legitimate Actions) अत्यंत महत्वाचा भाग म्हणून गणण्यात येईल याची प्रथम प्राधान्याने नोंद घ्यावी.**

१०. पुरवठा केलेले किराणा साहित्य प्राप्त झालेपासून ३० दिवसांच्या कालावधीत खराब आढळून आल्यास किंवा झाल्यास सदरचा किराणा साहित्य पुरवठादारास बदलून द्यावे लागेल.

११. पुरवठा केलेला किराणा साहित्य आपण ई-निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे नसल्यास किराणा साहित्य चा पुरवठा स्वीकारण्यात येणार नाही. सदरचा किराणा साहित्य रिजेक्ट करण्यात येईल त्या परिस्थितीत पुरवठादारास नमुन्याप्रमाणे तातडीने सदर किराणा साहित्य चा पुरवठा करावा लागेल त्यासाठी अवधी देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१२. किराणा साहित्य चा पुरवठा केल्यानंतर किराणा साहित्य ची पोहोच ई-मेलव्दारे पुरवठादारास पाठविण्यात येईल त्याप्रमाणे देयक/बील तातडीने पाठविण्याचे करावे. बील विलंबाने प्राप्त झाल्यास, त्यावर करावयाच्या कर कपातीमुळे वा इतर कारणांमुळे होणाऱ्या कुठल्याही नुकसानीस पुरवठादार स्वतः जबाबदार राहील.

१३. विलंबाने वा नमुन्याप्रमाणे किराणा साहित्य चा पुरवठा न झाल्यास त्यावर थेट मुद्दा क्र N मधील अट क्र १ प्रमाणे दंड पूर्वीच्या/नंतरच्या आलेल्या देयकातून/बीलातून/सुरक्षा अनामत रक्कमेतून कपात करण्यात येईल. याबाबत कुठलीही पूर्व सूचना पुरवठादारास अगोदर देण्यात येणार नाही.

१४. किराणा साहित्य चा पुरवठा हा श्री शनि भक्तांच्या गर्दीवर अवलंबून असल्याने, मासिक पुरवठा चलन ई-मेलव्दारे प्राप्त झाल्यानंतर, पुरवठादाराने मासिक किराणा साहित्य ची तजवीज करून ठेवावी मात्र किराणा साहित्य पाठविण्यापूर्वी त्याची पूर्व कल्पना खरेदी विभागास द्यावी लागेल. पुरवठ्यापोटी खरेदी विभागाच्या सूचनेप्रमाणे किराणा साहित्य चा पुरवठा करावा लागेल.

१५. पुरवठादाराने/निविदाकाराने ई-निविदे सोबत किराणा साहित्याचे नमुने सादर करताना असे किराणा साहित्याचे नमुने सादर करावेत जे वर्षभर उपलब्ध असतील व त्याप्रमाणेच पुरवठादारास संस्थानला किराणा साहित्याचा पुरवठा करता येईल. केवळ निविदा मिळविण्याच्या हेतूने उच्चतम किराणा साहित्याचे नमुने व न्यूनतम दर सादर करण्याचा प्रयत्न प्रकर्षाने टाळावेत याची प्रथम प्राधान्याने नोंद घ्यावी.

(अतुल चोरमारे)
कार्यकारी अधिकारी
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर.

# निविदाधारकाबाबत माहिती

| अ.क्र | तपशील | |
|---|---|---|
| १ | फर्मचे नांव | |
| २ | पत्र व्यवहारासाठी संपुर्ण पत्ता | |
| ३ | दूरध्वनी क्रमांक | |
| | मोबाईल नंबर | |
| | ऑफीस | |
| | दुकान | |
| | ई-मेल | |
| | | |
| ४ | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव | |
| | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक | |
| ५ | मालकाचे/भागीदारांची नावे | १) |
| | | २) |
| ६ | बँक खाते नांव | |
| | शाखा | |
| | खाते नंबर व प्रकार | |
| | IFSC कोड | |

दिनांक:- / / २०२६

ठिकाण:- निविदाधारकाची सही व शिक्का

## <u>Technical Bid</u> मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)

| अ.क्र | तपशिल | होय/नाही |
|---|---|---|
| १ | ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदययावत दुकान/संस्था नोंदणी प्रमाणपत्र / कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/ खाजगी कंपनी प्रमाणपत्र | |
| २ | GST नोंदणी दाखला | |
| ३ | पॅन कार्ड | |
| ४ | सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२५-२६ या ३ आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र व स्वाक्षरी केलेल्या वित्तीय विवरणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.<br>(किमान वार्षिक उलाढाल रू. १,००,००,०००/- असणे अनिवार्य) (<u>परिशिष्ट क</u>) | |
| ५ | अदयावत अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना(FSSAI परवाना) | |
| ६ | हमी पत्र/ निविदा स्वीकृती पत्र निविदा (<u>परिशिष्ट ब</u>) | |
| ७ | सिलबंद असलेले मालाचे नमुने स्वतंत्र देणे, त्यावर मालाचा प्रकार, फर्मचे नांव इ. तपशिलासह स्वाक्षरी केलेले | |
| ८ | नमुने दिलेल्या मालाची यादी | |

दिनांक - / /२०२६

ठिकाण - निविदाधारकाची सही व शिक्का

<u>परिशिष्ट ब</u>

<u>हमी पत्र/ निविदा स्वीकृती पत्र</u>

प्रति,
मा. कार्यकारी अधिकारी,
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था
शिंगणापूर., ता.नेवासा, जिल्हा-अहिल्यानगर.

विषय - ऑगस्ट २०२६ ते जुलै २०२७ करिता विविध विभागांसाठी किराणा साहित्य पुरविण्याचे ई-निविदेबाबत...

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या मालाचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री शनैश्वर देवस्थान, शनिशिंगणापूर यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे निविदा कालावधीत अगर निविदा कालावधी संपल्यानंतरही पुढील खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या मालाच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने मालाचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर मालाच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच विहीत केलेल्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे माल वेळेवर शनिशिंगणापूर येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक -   /   / २०२६
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव — सही/सहया व शिक्का

(१) ------------------------------------

(२) ------------------------------------

सोबत- कागदपत्रे

## परिशिष्ट क

## वार्षिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ---------------------------------- यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०२२-२३ व २०२३-२४, २०२४-२५ या ३ वर्षांची आर्थिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०२२-२३ | |
| २ | सन २०२३-२४ | |
| ३ | सन २०२४-२५ | |
| ३ वर्षांची सरासरी उलाढाल एकूण रक्कम | | |

- CA यांनी स्वाक्षरी केलेल्या वित्तीय विवरणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाउंटंट

नाव/ सही शिक्का

दिनांक:- / २०२६

नोंदणी क्रमांक.

ठिकाण:-

UDIN No.

# श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्त व्यवस्था, शिंगणापूर

## प्रसादालय,बर्फिप्रसाद व वसतिगृह विभागाकरिता विविध किराणा साहित्य पुरविणेबाबत (BOQ)

| पुरवठा कालावधी ऑगस्ट २०२६ ते जुलै २०२७ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | साहित्याचे नाव व कंपनी/क्वालिटी | अंदाजीत मागणी | प्रमाण | दर | एकुण रक्कम |
| १ | शेंगादाणे (बेस्ट क्वालीटी ) | १३४०० | कि.ग्रॅ | | |
| २ | मुगदाळ (बेस्ट क्वालीटी ) | १२६०० | कि.ग्रॅ | | |
| ३ | मगज बी (बेस्ट क्वालीटी ) | १२०० | कि.ग्रॅ | | |
| ४ | तुरदाळ (बेस्ट क्वालीटी ) | ५००० | कि.ग्रॅ | | |
| ५ | वटाणा (बेस्ट क्वालीटी ) | २४०० | कि.ग्रॅ | | |
| ६ | मुग (बेस्ट क्वालीटी ) | २१०० | कि.ग्रॅ | | |
| ७ | काबुली चना (बेस्ट क्वालीटी ) | २२०० | कि.ग्रॅ | | |
| ८ | चवळी (बेस्ट क्वालीटी ) | २१०० | कि.ग्रॅ | | |
| ९ | मठ (बेस्ट क्वालीटी ) | १६०० | कि.ग्रॅ | | |
| १० | मोहरी बारीक (बेस्ट क्वालीटी ) | १००० | कि.ग्रॅ | | |
| ११ | गूळ (तांबडा - बेस्ट क्वालीटी ) | ११०० | कि.ग्रॅ | | |
| १२ | हरबरा दाळ (बेस्ट क्वालीटी ) | ६५० | कि.ग्रॅ | | |
| १३ | लापशी भरडा (बेस्ट क्वालीटी ) | १२०० | कि.ग्रॅ | | |
| १४ | मठदाळ (बेस्ट क्वालीटी ) | ३५० | कि.ग्रॅ | | |
| १५ | गावरान हरभरा (बेस्ट क्वालीटी ) | २१०० | कि.ग्रॅ | | |
| १६ | आटा (कनक/स्वाद/सिल्वर कोईन) | ७१००० | कि.ग्रॅ | | |
| १७ | तांदूळ (स्टीम राईस-मदर इंडिया/चाँदतारा) | ३८००० | कि.ग्रॅ | | |
| १८ | रवा बारीक ( तीन पान/आशीर्वाद/राधी ) | ३०५०० | कि.ग्रॅ | | |
| १९ | रवा जाड ( तीन पान/आशीर्वाद/राधी ) | १५००० | कि.ग्रॅ | | |
| २० | मैदा (तीन पान/आशीर्वाद/राधी ) | १५००० | कि.ग्रॅ | | |
| २१ | गावरान तुप (गोविंद/गोवर्धन ) | १००० | कि.ग्रॅ | | |
| २२ | जीरे (समाधान/डायमंड ) | ११०० | कि.ग्रॅ | | |
| २३ | शेंगादाणा तेल (जेमिनी/क्वॉलीटी) | ११०० | कि.ग्रॅ | | |
| २४ | शाबुदाणा (कॅमल) | ६५० | कि.ग्रॅ | | |
| २५ | बेदाणे (बेस्ट क्वालीटी ) | ३५० | कि.ग्रॅ | | |
| २६ | हावरी/तीळ (समाधान,डायमंड) | १००० | कि.ग्रॅ | | |
| २७ | हिरवी विलायची (एव्हरेस्ट) | ३२ | कि.ग्रॅ | | |
| २८ | बेसनपीठ ( हिरा/सम्राट) | ११५० | कि.ग्रॅ | | |
| २९ | बुंदी कलर (पुष्पक कंपनी- पिवळा १०० ग्रॅम ) | ५००० | नग | | |

## प्रसादालय,बर्फिप्रसाद व वसतिगृह विभागाकरिता विविध किराणा साहित्य पुरविणेबाबत (BOQ)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३० | बुंदी कलर - ( केसरी - १०० ग्रॅम) | १००० | नग | | |
| ३१ | नाकेश्वर (बेस्ट क्वालीटी ) | २० | कि.ग्रॅ | | |
| ३२ | पोहे ( स्वस्तीक ) | ९०० | कि.ग्रॅ | | |
| ३३ | मीठ बारीक ( टाटा/ निरमा) | ५५०० | कि.ग्रॅ | | |
| ३४ | चहापावडर ( परिवार/सह्याद्री ) | १५० | कि.ग्रॅ | | |
| ३५ | लवंग (बेस्ट क्वालीटी ) | ३० | कि.ग्रॅ | | |
| ३६ | काळे मिरे (बेस्ट क्वालीटी ) | ३० | कि.ग्रॅ | | |
| ३७ | सिल्व्हर कंटेनर - मोठी साईज ) | ५००० | नग | | |
| ३८ | बेगडी मिरची (बेस्ट क्वालीटी ) | ६० | कि.ग्रॅ | | |
| ३९ | गोटा खोबरा (बेस्ट क्वालीटी ) | ६० | कि.ग्रॅ | | |
| ४० | खडा मसाला (बेस्ट क्वालीटी ) | ३५ | कि.ग्रॅ | | |
| ४१ | खडीसाखर पत्री (बेस्ट क्वालीटी ) | ३०० | कि.ग्रॅ | | |
| ४२ | नाश्ता डिश प्लेट (बेस्ट क्वालीटी ) | २२००० | नग | | |
| ४३ | पत्रावळी (कागदी,कप्प्याची - बेस्ट क्वालीटी ) | १३००० | नग | | |
| ४४ | कर्णफुल (बेस्ट क्वालीटी ) | २५ | कि.ग्रॅ | | |
| ४५ | नारळ | ३०० | नग | | |
| ४६ | बिस्कीटे, मारीगोल्ड (७३.८ ग्रॅम) | ८०० | नग | | |
| ४७ | बिस्कीटे, पारले जी (९० ग्रॅम) | ६०० | नग | | |
| ४८ | बिस्कीटे,गुड्डे (६०.१ ग्रॅम) | ५०० | नग | | |
| ४९ | हुलगे (बेस्ट क्वालीटी ) | १०० | कि.ग्रॅ | | |
| ५० | काजू (बेस्ट क्वालीटी ) | ६ | कि.ग्रॅ | | |
| ५१ | कॉफी ( नेस - ५० ग्रॅम ) | ४० | नग | | |
| ५२ | चिंच (बेस्ट क्वालीटी ) | ३० | कि.ग्रॅ | | |
| ५३ | अख्खा मसुर (बेस्ट क्वालीटी ) | ६० | कि.ग्रॅ | | |
| ५४ | काजु पाकळी (बेस्ट क्वालीटी ) | ५ | कि.ग्रॅ | | |
| ५५ | पाणी ग्लास ( मोठी साईज ) | ७००० | नग | | |
| ५६ | तमालपत्र (बेस्ट क्वालीटी ) | ३५ | कि.ग्रॅ | | |
| ५७ | ग्रीन टी १०० ग्रॅम (TATA) | २५ | नग | | |
| ५८ | बदाम (बेस्ट क्वालीटी ) | ५ | कि.ग्रॅ | | |
| ५९ | बडीशेप कच्ची (समाधान ) | १६ | कि.ग्रॅ | | |
| ६० | पापड ( लिज्जत/ समाधान ) | १० | कि.ग्रॅ | | |
| ६१ | जायपत्री (बेस्ट क्वालीटी ) | १ | कि.ग्रॅ | | |
| ६२ | खोबरेतेल (पॅराशुट -५०मीली ) | १५० | नग | | |
| ६३ | चहा पार्सल (मेडियम साईज -बेस्ट क्वालीटी ) | ७००० | नग | | |
| ६४ | भांडी साबण ( विमबार) | ४२० | नग | | |

## प्रसादालय,बर्फिप्रसाद व वसतिगृह विभागाकरिता विविध किराणा साहित्य पुरविणेबाबत (BOQ)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६५ | प्लास्टीक चमचा (बेस्ट क्वालीटी ) | ७००० | नग | | |
| ६६ | शहाजीरे (समाधान/डायमंड) | २ | कि.ग्रॅ | | |
| ६७ | हॅण्ड वॉश (डेटॉल/संतूर - २०० मिली) | ५० | नग | | |
| ६८ | पावडर ( PONDS -१८ ग्रॅम ) | २०० | नग | | |
| ६९ | काजुकणी (बेस्ट क्वालीटी ) | ३ | कि.ग्रॅ | | |
| ७० | मीठ जाड (निरमा/टाटा) | २०० | कि.ग्रॅ | | |
| ७१ | गॅस लायटर ( मोठी साईज ) | १५ | नग | | |
| ७२ | टुथपेस्ट १०ग्रॅमचे ( कोलगेट ) | २०० | नग | | |
| ७३ | साबण ( मेडीमिक्स - २० ग्रॅम ) | २०० | नग | | |
| ७४ | सुरी ( चाकू - मोठी साईज ) | २० | नग | | |
| ७५ | पीठ चाळण ( मोठी साईज ) | १० | नग | | |
| ७६ | काडेपेटी बॉक्स | ४५ | बॉक्स | | |
| ७७ | आमसुल (बेस्ट क्वॉलीटी ) | २ | कि.ग्रॅ | | |
| ७८ | दगडफुल (बेस्ट क्वॉलीटी) | १ | कि.ग्रॅ | | |
| ७९ | मसाला विलायची (बेस्ट क्वॉलीटी) | १ | कि.ग्रॅ | | |
| ८० | उडीद दाळ (बेस्ट क्वॉलीटी ) | २५० | कि.ग्रॅ | | |
| ८१ | अगरबत्ती ( बीग/सायकल) | ५१ | नग | | |
| ८२ | ओवा (बेस्ट क्वॉलीटी ) | १० | कि.ग्रॅ | | |
| ८३ | खाता सोडा ( बेस्ट क्वॉलीटी ) | १० | कि.ग्रॅ | | |
| ८४ | हळद पावडर (मेघनंद/सुहाना ) | १००० | कि.ग्रॅ | | |
| ८५ | किचनकिंग मसाला (मेघनंद/ सुहाना ) | ४२० | कि.ग्रॅ | | |
| ८६ | कांदा लसुण मसाला (मेघनंद/ सुहाना ) | ६४० | कि.ग्रॅ | | |
| ८७ | सांबर मसाला (मेघनंद/सुहाना ) | ३८० | कि.ग्रॅ | | |
| ८८ | मटकी मसाला (मेघनंद/सुहाना ) | ३०० | कि.ग्रॅ | | |
| ८९ | मिरची पावडर (मेघनंद/सुहाना ) | ३४० | कि.ग्रॅ | | |
| ९० | धना पावडर (मेघनंद/सुहाना ) | ६५० | कि.ग्रॅ | | |
| ९१ | छोले मसाला (मेघनंद/सुहाना ) | ३०० | कि.ग्रॅ | | |
| ९२ | गरम मसाला (मेघनंद/सुहाना ) | ३८० | कि.ग्रॅ | | |
| ९३ | काळा मसाला (मेघनंद/सुहाना ) | ३८० | कि.ग्रॅ | | |
| ९४ | अंबारी चटपट मसाला (मेघनंद/सुहाना) | ६० | कि.ग्रॅ | | |
| ९५ | कस्तुरी मेथी (मेघनंद/सुहाना) | ३५ | कि.ग्रॅ | | |
| ९६ | व्हेज पुलाव मसाला (मेघनंद/सुहाना) | २५ | कि.ग्रॅ | | |
| ९७ | दालचिनी (मेघनंद/सुहाना) | २५ | कि.ग्रॅ | | |
| ९८ | सोयाबीन वडी (मेघनंद/सुहाना) | १०० | कि.ग्रॅ | | |
| ९९ | बिर्याणी मसाला (मेघनंद/सुहाना ) | २५ | कि.ग्रॅ | | |

## प्रसादालय,बर्फिप्रसाद व वसतिगृह विभागाकरिता विविध किराणा साहित्य पुरविणेबाबत (BOQ)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०० | रेम्बो मसाला (मेघनंद/सुहाना) | २ | कि.ग्रॅ | | |
| १०१ | टेस्टींग पावडर (मेघनंद/सुहाना) | १ | कि.ग्रॅ | | |
| १०२ | चना मसाला (मेघनंद/सुहाना) | २ | कि.ग्रॅ | | |